स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विदयापीठ नांदेड

मानव्य विद्याशाखेअंतर्गत लोकप्रशासन विषयातील

पीएच.डी. संशोधन कार्यासाठी सादर करावयाचा

संशोधन आराखडा

संशोधनाचा विषय

ग्रामीण विकास प्रशासनात महिला अधिकारी व कर्मचारी वर्गाची भूमिका, समस्या व उपाय विशेष संदर्भ : नांदेड जिल्हा

संशोधकाचे नांव

स्नेहल संतोष कुलकर्णी

एम.ए.(लोकप्रशासन)] सेट

देगलूर महाविद्यालय देगलूर

मार्गदर्शकाचे नांव

डॉ.बी.आर.कत्तुरवार

लोकप्रशासन विभाग प्रमुख,लोकप्रशासन विभाग व संशोधन केंद्र

देगलूर महाविदयालय देगलूर ता.देगलूर जि.नांदेड

प्रस्तावना :

भारतीय अर्थव्यवस्था ही प्रामुख्याने ग्रामीण अर्थव्यवस्था आहे. देशाची आर्थिक वृध्दी ही ग्रामीण विकासाला गतिशील करते. ग्रामीण विकास हा विकासाच्या विस्तृत संकल्पनेचा एक महत्वाचा घटक आहे. ग्रामीण भाग हा देशाच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय विकासाचा केंद्रबिंदू असला पाहिजे. भारताच्या विकासाची खरी बीजे ग्रामीण भागातच रुजलेली आहेत. जोपर्यंत ग्रामीण भागाचा विकास होत नाही. तोपर्यंत राष्ट्राचा विकास होणे शक्य नाही. ही बाब स्पष्ट आहे. त्यामुळे ग्रामीण भागांचा विकास होणे क्रमप्राप्त आहे.

भारत हा खेडयांनी मिळून बनलेला देश आहे. भारतातील एकूण लोकसंख्येपैकी सुमारे 74.28 टक्के लोक ग्रामीण भागात वास्तव्य करतात. केवळ महाराष्ट्रापुरता विचार करता 61.27 टक्के लोक ग्रामीण भागात राहत असल्याचे दिसून येते. त्यामूळे भारताच्या पर्यायाने महाराष्ट्राच्या विकासाचा प्रश्न ग्रामीण विकासाशी निगडीत आहे.

प्राचीन काळापासून ग्रामीण भगाच्या विकासासाठी मोठया प्रमाणात प्रयत्न करण्यात आले आहेत. प्राचीन काळामध्ये खेडीही स्वयंपूर्ण होती. ग्रामीण भागात विकास करण्यामध्ये ग्राम पंचायतींची महत्वाची भुमिका होती. भारतात स्वातंत्रयापुर्वी व स्वातंत्र्यानंतर ग्रामीण विकासासाठी वेगवेगळे कार्यक्रम व योजना यांची आखणी करण्यात आली होती. त्यात प्रामुख्याने सर्वोदय योजना, सामुदायिक विकास कार्यक्रम, इंदिरा आवास योजना अशा अनेक योजनांचा समावेश होता. या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात आली व त्यादवारे ग्रामीण विकास साध्य करणे शक्य होऊ लागले आहे.

ग्रामीण विकास :

ग्रामीण विकास ही संकल्पना ग्रामीण भागातील जनतेच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व सांस्कृतिक विकासावर आधारलेली आहे. ग्रामीण विकासाचा अर्थ, ग्रामीण भागाचा एकूण विकास ज्यामुळे जीवनमानाच्या गुणवत्तेत सुधारणा होते. ग्रामीण विकास हा सर्वसाधारणपणे दारिद्रयाचे निर्मुलन करणारा सर्वसमावेशक व शाश्वत असावा.

व्याख्या :

जागतिक बँकेने केलेली व्याख्या :

ग्रामीण विकास ही एक अशी व्युवचना आहे की, ज्यामुळे ग्रामीण भागातील विशिष्ट लोकांचे आर्थिक व सामाजिक जीवनमान उंचावण्यास मदत होते. उदरनिर्वाहाची पातळी उंचावण्यास मदत होते. यामध्ये कूळ, अल्पभूधारक, भुमिहीन शेतमजूर इत्यादींचा समावेश होतो.

भारतीय नियोजन आयोग :

ज्या प्रक्रियेमुळे ग्रामीण लोकांच्या आर्थिक व सामाजिक जीवनमानात सुधारणा घडवून आणली जाते. तिला ग्रामीण विकास म्हणता येईल. ग्रामीण भागातील आर्थिक व सामाजिक मागासलेल्या समुहांचा सक्रिय सहभाग, भौतिक व मानवी संसाधनांचा योग्य वापर, संपत्तीचे विकेंद्रीकरण व नियोजन, तांत्रिक ज्ञानाचा वापर याव्दारे ग्रामीण विकास साध्य करता येऊ शकतो.

ग्रामीण विकासाचे महत्व :

1) **सार्वजनिक आरोग्य व स्वच्छता :**

   आरोग्य आणि स्वच्छताविषयक सेवा-सुविधा, शुध्द पाणीपुरवठा माफक आरोग्यविषयक सुविधा तसेच पोषण आहार पुरवठा, बालक व माता आरोग्य योजना यामुळे ग्रामीण विकासात सुधारणा होते. यामुळे ग्रामीण भागातील जीवनमानाचा स्तर उंचावला जातो.

2) **ग्रामीण साक्षरता प्रमाण :**

   सामाजिक व आर्थिक बदल घडविण्यासाठी साक्षरता हे अत्यंत महत्वाचे साधन आहे. नागरी व ग्रामीण भागात साक्षरतेच्या प्रमाणात फारच मोठी तफावत आढळते. ग्रामीण विकासाच्या माध्यमातून विविध शैक्षणिक योजनांची अंमलबजावणी करुन ही तफावत कमी करता येते.

3) **महिला सक्षमीकरण :**
ग्रामीण विकासादवारे लिंग भेदभाव कमी करणे, ग्रामीण महिलांच्या विविध गरजांची पूर्तता करणे, सामाजिक विकासाच्या कार्यक्रमात महिलांचे योगदान वाढविणे इत्यादीमुंळे महिला सक्षमीकरणाला प्रोत्साहन मिळते.

4) **भू-सुधारणा :**
ग्रामीण विकासांतर्गत भू-सुधारणा कायदयांची परिणामकारक अंमलबजावणी करता येते. उदा.कमाल भू-धारणा, जमिनीची मालकी, खंडाबाबतचे नियमन व भूधारकाची सुरक्षा यांमुळे ग्रामीण भागातील विषमता कमी करता येते.

5) **पायाभुत सुविधांचा विकास :**
ग्रामीण विकासादवारे पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा करता येतात. उदा.पाणीपुरवठा, वीजपुरवठा, रस्ते विकास, जलसिंचनाच्या सोई, इ.

6) **पतपुरवठयाची उपलब्धता :**
ग्रामीण विकासांतर्गत वित्त पुरवठा करणाऱ्या संस्थांमध्ये वाढ करता येते. ज्यामळे ग्रामीण भागात वित्त/पतपुरवठा सुलभतेने होऊ शकतो. उदा.प्राथमिक सहकारी कृषी पतपुरवठा संस्था, सहकारी बँक, इ. या संस्थादवारे शेतकऱ्यांना सवलतीच्या दरात पतपुरवठा करणे शक्य होते.

7) **दारिद्रय निर्मूलन :**
ग्रामीण विकासादवारे व्यक्तीचे उत्पन्न व जीवनमान उंचावण्यास मदत होते. यामुळे ग्रामीण भागातील दारिद्रयाचे निर्मुलन करणे शक्य होते.

ग्रामीण विकास प्रशासनात महिला अधिकारी व कर्मचाऱ्यांची भूमिका, समस्या व उपाय

प्रशासनाच्या सर्वच क्षेत्रात स्त्रियांनी आपल्या कार्याचा ठसा उमटवला आहे. शिक्षण, आरोग्य, महसुल, सुरक्षा, व्यवस्थापन अशा सर्व क्षेत्रांमध्ये विविध स्तरांवर महिला अधिकारी व कर्मचारी सक्षमपणे

आपली भुमिका पार पाडताना दिसतात भारतीय प्रशासनात केंद्र, राज्य,विभाग, जिल्हा, तालुका, गाव अशा विविध प्रशासनाच्या स्तरांवर महिला अधिकारी व कर्मचारी वर्गाचे योगदान महत्वपुर्ण आहे. असे असले तरी एकुण श्रमशक्ती सहभागामधील महिलांचा सहभाग घटत चालला आहे. जागतिक बँक अहवालानुसार 1990 या वर्षातील एकुण श्रमशक्ती सहभागातील (LFPR) महिलांचे प्रमाण 30% होते. ते 2016 या वर्षी 23.36%, 2017 या वर्षात 21.03 %, 2018 या वर्षी 20.7 % आणि 2019 या वर्षात 20.5% असे सातत्याने घटले आहे. पांरपारिक समाजव्यवस्थेने घालून दिलेली निर्बंध मोडून समान अधिकारांसाठी आणि समाजात आपले स्थान निर्माण करण्यासाठी स्त्री संघर्ष करीत आहे.# 'Me Too' या चळवळीमुळे शतकानुशतके चालत आलेल्या पुरुषप्रधान व्यवस्थेला धक्का पोहोचला आहे. पण हा बदल घडून येण्यासाठी फार मोठा काळ जावा लागणार आहे.

शेकडो वर्षांपासून देशाच्या लोकसंख्येच्या निम्म्या लोकसंख्येचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या महिला समाज घटक राजकारण, शिक्षण, प्रशासन व अर्थकारण इ.घटकांपासून कोसो दूर होता. अशा समाजातील प्रमुख पण दुर्लक्षित घटक असलेल्या महिला समाज घटकाला आरक्षणाच्या धोरणामुळे प्रशासनात सहभागी होता आले. त्यामुळे सामाजिक न्याय व समानतेच्या त्तत्वाला अनुसरुन समाजात सकारात्मक परिवर्तन होऊ लागले आहे. तरी देखील प्रशासनात महिला अधिकारी व कर्मचारी वर्गाला आज देखील विविध् समस्यांना तोंड देत प्रशासन चालवावे लागतृे विशेषत: ग्रामीण प्रशासनात लोकांशी प्रत्यक्ष संबंध येत असल्यामुळे येथे काम करणाऱ्या महिला अधिकारी व कर्मचाऱ्यांची भूमिका अधिक जबाबदारीची ठरते. ग्रामीण भागात महिला ग्रामसेवक, शिक्षिका, अंगणवाडी सेविका, परिचारिका, स्वच्छता कर्मचारी, आरोग्य अधिकारी, तलाठी, बँकेतील कर्मचारी, पोलीस अशा विविध भुमिकांमधून महिला अधिकारी व कर्मचारी कार्य करताना दिसतात प्रशासनात काम करताना त्यांना कोणकोणत्या समस्यांना सामोरे जावे लागते त्यांचा शोध घेणे व त्यांचा समस्या सोडविण्यासाठी उपाय शोधणे ही उद्दिष्टे ठेऊन हे संशोधन कार्य हाती घेण्यात आले आहे.

संपुर्ण इतिहासात महिलांनी गृहिणी, आई आणि पालनपोषक अशी भूमीका घेतली आहे. आजही मातृत्व ही स्त्रियांसाठी प्राथमिक भूमिका मानली जाते जेव्हा आपण आपल्या समाजातील नोकरी करणाऱ्या महिलांच्या समस्यांचा विचार करतो, तेव्हा तिचे घरगुती जीवन लगेच लक्षात येते. कौटुंबिक सामाजिक, आर्थीक जबाबदारी पार पाडत असताना तिला तारेवरची कसरत करावी लागते. ग्रामीण

भागात काम करणाऱ्या महिलांना पायाभूत सुविधांच्या अभावामुळे विविध अडचणी उद्भवतात उदा. पाणी, रस्ते, महिलांसाठी स्वतंत्र शौचालये व स्वच्छतागृहांचा अभाव, अपुरे मुनष्यबळ आणि व्यापक कार्यक्षेत्र यांमुळे कदाचित त्यांना पुर्णवेळ कार्यालयात किंवा संस्थेत काम करावे लागले. बऱ्याचदा त्यांना टिकेला सामोरे जावे लागते.

आजही स्त्रियांना पुरुषंप्रमाणे वागणूक मिळत नाही. समान कामासाठी 'समान वेतन मिळायला हवे' हे शाश्वत विकसाचे ध्येय निश्चित केले आहे. पण पुरुष कर्मचाऱ्यांच्या तुलनेत स्त्रियांना कमी पगार दिला जातो. कितीही उच्चशिक्षित असली तरी समाजातील रुढी, परंपरांचा दबाव व स्वत: बद्दलचा असलेला न्युनगंड यामुळे तिच्यात आत्मविश्वासाचा अभाव दिसतो. त्यामुळे प्रशासकीय निर्णय घेताना अडचण निर्माण होते. स्त्री संवेदनशील असल्याने तिच्या निर्णयक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण केले जाते. आणि तिचा आवाज दडपून टाकला जातो. स्त्रियांचे कार्यक्षेत्रात गेरसौय होण्याचे आणखी एक क्षेत्र म्हणजे भेदभाव होय. लैंगिक भेदभाव महिलांना कमी पगाराच्या नोकरीवर काम करण्यास भाग पाडतो. एखादया महिलेच्या पदोन्नतीकडे दुर्लक्ष केले जाऊ शकते किंवा तिला नोकरीपासून मुक्त केले जाऊ शकते कारण ती महिला गर्भवती किंवा स्तनदा माता आहे किंवा वर्क ग्रुपच्या कामानंतर वगळण्यात आली आहे. कामाच्या ठिकाणी लैंगिक छळ ही देखील समस्या उद्भभवू शकते. त्यामुळे महिलांना नोकरी करणे अधिक कठिण बनते.

संशोधनाची उद्दिष्टे :

1) ग्रामीण विकास प्रशासनातील महिला अधिकारी व कर्मचारी याना प्रशासकीय कामकाज चालवित असताना येणाऱ्या विविध समस्या व अडचणींचा अभ्यास करणे.
2) महिला अधिकारी व पुरुष अधिकारी तसेच महिला अधिकारी व वरिष्ठ अधिकारी यांच्यातील संबंध अभ्यासणे.
3) महिला अधिकारी व कर्मचाऱ्यांना समाजव्यवस्थेत आणि प्रशासन व्यवस्थेत कशी वागणूक मिळते याचा शोध घेणे.
4) नागरिक प्रशासनातील व महिला यांच्यातील संबध कसे आहेत याचा शोध घेणे.

5) महिला सबलीकरणात महिला अधिकारी व कर्मचाऱ्यांचे विशेष योगदान अभ्यासणे.

6) बाल विकास व आरोग्य संवर्धनात महिलांचे योगदान अभ्यासणे

7) ग्रामीण पातळीवर स्त्री-पुरुष समानता, स्त्री-शिक्षण व महिला सबलीकरण याबाबत जागृती निर्माण करुन प्रशासनात स्त्री सहभाग वाढीसाठी जागृती करणे.

संशोधनाची गृहित कृत्ये :

1) ग्रामीण प्रशासनातील महिला अधिकारी व कर्मचारी आणि नागरिक यांच्यातील संबंध विश्वासाचे व सहकार्याचे आहेत.

2) महिला अधिकारी व कर्मचारी आपले कर्तत्व व जबाबदारी निष्पक्षपणे व कार्यक्षमपणे बजावतात.

3) महिला अधिकारी व कर्मचाऱ्यांप्रती पुरुष अधिकाऱ्यांचा दृष्टीकोण पुर्वगृदूषित आहे.

4) महिला अधिकारी व कर्मचाऱ्यांना विशेष योगदानामुळे स्त्री विकासाच्या योजना प्रभावीपणे अंमलात आल्या आहेत.

5) महिला अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रशासन चालविताना विविध कौटुंबिक समस्यांचा सामना करावा लागतो.

6) महिलांना आरक्षण असूनही त्यांचा प्रशासनातील अनुशेष शिल्लक आहे.

संशोधनाची पध्दत :

प्रस्तुत संशोधन कार्यासाठी संशोधनाच्या समाजिक सर्वेक्षण पध्दतीचा अवलंब केला जाईल. नांदेड जिल्हयातील 16 तालुक्यातील काही गावाची यादृच्छिकपणे निवड केली जाईल.

संशोधनाचे क्षेत्र:

ग्रामीण विकास प्रशासनात महिला अधिकारी व कर्मचारी वर्गाची भूमिका व त्यांच्या समस्या जाणून घेण्यासाठी नांदेड जिल्हा हे संशोधन क्षेत्रा मर्यादित केले आहे.

नमुना निवड :

प्रस्तुत संशोधन सर्वेक्षण पद्रधतीवर आधारलेले असेल. संशोधनासाठी नांदेड जिल्हयातील निवड केलेल्या जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायती मधील महिला अधिकारी व कर्मचारी तसेच काही निवडक नागरीकांचा समावेश असेल.

तथ्य संकलन :

प्रस्तुत संशोधन कार्यात तथ्य संकलन करण्यासाठी तथ्य संकलनाच्या प्राथमिक व व्दितीयक स्त्रोतांचा वापर करण्यात येईल.

प्राथमिक स्त्रोत :

यात निवड केलेल्या गावातील विकास कार्यात सहभागी शासकीय महिला व पुरष अधिकारी व कर्मचारी तसेच स्थानिक नागरिक यांची प्रत्यक्ष मुलखत व प्रश्नावलीच्या माध्यमातून तथ्य संकलन केले जाईल.

व्दितीयक स्त्रोत :

यात विविधि पुस्तके, संदर्भ्, ग्रंथ, शोधप्रबंध, शासकीय अहवाल, वर्तमानपत्रे तसेच संगणकीय साधनांचा उपयोग करण्यात येणार आहे.

संशोधन आराखडा :

ग्रामीण विकास प्रशसनात महिला अधिकारी व कर्मचारी वर्गाची भूमिका, समस्या व उपाय विशेष संदर्भ- नांदेड जिल्हा' या संशोधन विषयाचा पुढील प्रकरणांतून अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण 1 – प्रस्तावना :

प्रस्तुत प्रकरणात संशोधन विषयाची पार्श्वभुमी, महत्व व स्वरुप याची विस्ताराने मांडणी करण्यात येईल. तसेच संशोधनाचे महत्व, संशोधनाची उदिदष्टे, संशोधनाची गृहीतके, संशोधनाचे क्षेत्र, नमुना निवड व तथ्य संकलन या सर्व बाबींचा समावेश असेल. या संशोधन विषयावर आजपर्यंत झालेल्या संशोधन साहित्याचा आढावा देखील घेण्यात येईल.

प्रकरण 2 – ग्रामीण विकास प्रशासनाचे स्वरुप व रचना :

या प्रकरणत ग्रामीण विकासाचा अर्थ, व्याख्या, भारतीय अर्थव्यवस्थेतील ग्रामीण विकासाचे महत्व, ग्रामीण विकासाची उत्क्रांती इत्यादीचा समावेश असेल. तसेच ग्रामीण विकासात प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी यांचा सहभाग व भूमिका याचा अभ्यास करण्यात येईल.

प्रकरण 3 – नांदेड जिल्हा : एक दृष्टीक्षेप :

या प्रकरणात नांदेड जिल्हयाची ऐतिहासिक पार्श्वभूमी, भौगोलिक स्थान व क्षेत्रफळ, प्रादेशिक रचना, प्रशासकीय रचना, सामाजिक व सांस्कृतिक पार्श्वभुमी, आर्थिक व शैक्षणिक स्थिती यांचा आढावा घेण्यात येईल.

प्रकरण 4 – ग्रामीण विकास व ग्रामीण प्रशासनात महिलांचा सहभाग : सहसंबंध

या प्रकरणात ग्रामीण प्रशासनात महिलांचा सहभाग, ग्रामीण विकासात महिलांचे योगदान, ग्रामीण प्रशासनात महिलांना संधी व समानतेचा अभ्यास करण्यात येईल तसेच ग्रामीण विकासात महिला अधिकारी व कर्मचारी वर्गाची भूमिका काय आहे याचा चिकित्सक अभ्यास करण्यात येईल.

प्रकरण 5 – महिला अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या समस्या :

प्रस्तुत प्रकरणात ग्रामीण भागात कार्यरत असलेल्या महिला अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रशासकीय कार्य करताना कोणकोणत्या समस्यांना सामोरे जावे लागेल याचा शोध घेण्यात येईल.

प्रकरण 6 – निष्कर्ष व उपाय

प्रस्तुत प्रकरणात संशोधन कार्यातील अंतिम निष्कर्ष नमूद करण्यात येतील व त्यादवारे उपाय सुचविण्यात येतील.

संदर्भ सूची :

1. प्रा.के.आर.बंग – महाराष्ट्र प्रशासन – विदयाबुक पब्लिशर्स, औरंगाबाद.
2. प्रा.के.आर.बंग – जिल्हा प्रशासन – विदयाबुक पब्लिशर्स, औरंगाबाद.
3. प्रा.डॉ.सौ.रेखा इंगोले (माने) – महिला सक्षमीकरण समस्या आणि उपाय ईशा पब्लिकेशन, लातूर.
4. डॉ.इकबल खान – पंचायती राज एवं ग्रामीण विकास योजनाएँ
5. http://mr. vikaspedia.in/social-walfare
6. http.//mr.vikaspedia.in/social-welfare/govt-scheme
7. http://www.governancenow.com.
8. वर्तमानपत्रे – दै.लोकसत्ता, दै.लोकमत, दै. महाराष्ट्र टाईम्स

संशोधक — मार्गदर्शक

स्नेहल संतोष कुलकर्णी — **डॉ. बी.आर कत्तुरवार**